अंक ९ वा

दिनांक :-
१ मार्च २०२१

# सायबर सारथी

(साप्ताहिक माहितीपत्र)

## सायबर सेल

गुन्हे शाखा
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

# इनकम टॅक्स रिफंड फ्रॉड

आपले आर्थिक वर्ष हे **1 एप्रिल ते 31 मार्च** असे आहे. या आर्थिक वर्षात प्रत्येकाने आपला इनकम टॅक्स – आयकर भरणे बंधनकारक आहे. अनेकदा आयकर हा आर्थिक वर्ष संपण्यापूर्वीच भरला जातो. आपले आयकर विवरणपत्र कर विभागाला सादर करण्यापूर्वी अनेकजण आगाऊ कर जमा करतात. आयकर विवरणपत्र तयार केल्यावर आपण आगाऊ भरलेला कर हा आपल्या उत्पन्नाला लागू करापेक्षा अधिक असेल तर असा कर आपणास परत केला जातो. यास इनकम टॅक्स रिफंड असे म्हणतात. याच आयकर परताव्याच्या निमित्ताने सायबर गुन्हेगार आपल्याला संपर्क करून आपली फसवणूक करू शकतात.




## प्रसंग

एक आय टी अभियंता वरुण (नाव बदलेले आहे) एका सॉफ्टवेअर कंपनीत मोठ्या हुद्दयावर  नोकरीस होता.  त्याच्या हुद्दयास अनुसरून त्याला चांगला पगारही होता आणि त्यामुळे त्याला दरवर्षी आयकर भरावा लागत होता. हा आयकर तो नेहमीप्रमाणे वेळेवर भरत देखील होता. 2018 मध्ये त्याने  2017-18 या आर्थिक वर्षाचा त्याचा कर आगाऊ भरला होता आणि निर्धारित वेळेत त्याने त्याचे आयकर विवरणपत्र कर विभागास त्याच्या सीए मार्फत सादर केले होते. मार्च महिन्याचे दुसर्‍या आठवड्यात त्यास त्याच्या ईमेल आयडी वर इनकम टॅक्स विभागाकडून एक मेल प्राप्त झाला ज्यात त्याला 19076 रुपये आयकर परतावा (इनकम टॅक्स रिफंड) मिळणार असल्याचे नमुद केले होते. त्याला प्राप्त झालेल्या ईमेल मध्ये काही सूचना नमूद करण्यात आल्या होत्या. त्याला अनुसरून त्याचे सर्टिफिकेट त्याला ईमेल वर पाठविण्यास सांगितले होते. त्याने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करुन त्याप्रमाणे

# TAX FRAUD

पूर्तता केली. त्या दिवशी रात्री उशिरा त्याला एका पाठोपाठ एक एसएमएस मोबाइल वर प्राप्त झाले. एसएमएस नोटिफिकेशन साऊंड मुळे त्याची झोपमोड झाली कारण एसएमएस एकापाठोपाठ एक येतच राहिले आणि सलग वाजणाऱ्या फोनमुळे काही एमर्जन्सी आहे का हे पाहण्यासाठी जेंव्हा त्याने त्याचा मोबाइल पाहिला तेंव्हा त्याच्या पायाखालची जमीन सरकली.


**त्याच्या सॅलरी अकाऊंट मधून एकूण 09,50,000 रुपये 7 अज्ञात खात्यावर ट्रान्सफर झाल्याबाबत त्याला एसएमएस प्राप्त झाले होते.** हे एसएमएस वाचून होईपर्यंत त्याने त्याच्या बँकेत ऑनलाइन पद्धतीने केलेल्या फिक्स डिपॉजिट देखील ऑनलाइन पद्धतीने त्याचा कालावधी पूर्ण होण्याआधीच लिक्विडेट करून एकूण 08,00,000 रुपये वेगवेगळ्या खात्यांवर पाठविण्यात आले होते. **एकूण 17,50,000 रुपये वरूण च्या खात्यावरून त्याच्या परवानगी शिवाय काढून घेण्यात आले होते.** वरुणचे संपूर्ण बचत खाते रिकामे झाले होते त्यामुळे त्याने सदर बाबत तत्काळ पोलिसांशी संपर्क करून गुन्हा दाखल केला.



# TAX FRAUD

तपासात वरुण कडून प्राप्त झालेली माहिती आणि त्याच्या Mobile Analysis च्या आधारे निष्पन्न झाले की, इनकम टॅक्स रिफंड करिता वरुणला आलेला मेल हा अधिकृत नसून बनावटी होता. त्यात एक URL देण्यात आली होती ज्यावरून एक APK फाईल (जी Certificate या नावाने होती) डाऊनलोड करून ती इंस्टॉल करण्यास सांगण्यात आले होते. ही APK फाईल एका Android App ची असून हे Unknown Source असलेले App वरुण ने त्याच्या मोबाइल मधील सर्व Permission देऊन इंस्टॉल केले होते. हे App वरुणच्या मोबाइल मधील सर्व डाटा वाचू शकत होते, त्यात बदल करू शकत होते, त्याचे मोबाइलचा रीमोट ऍक्सेस देखील घेत होते. याच Application मुळे वरुणचा घात झाला होता आणि गुन्हेगाराला त्याच्या मोबाइल मधील सर्व माहिती मिळून त्याचे बँक अकाउंट रिकामे करण्यास मदत मिळाली होती.

**तुम्हाला देखील अशाप्रकारे फसवण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. त्यामुळे सावध रहा.**



# कशी होते फसवणूक ?

- **ज्याला फसवायचे आहे त्या व्यक्तीबद्दल सायबर गुन्हेगार सोशल मीडिया आणि इतर माध्यमातून माहिती गोळा करतात.** त्या व्यक्तीचा Official Mail ID मिळवून त्यांना Personalised Mail – Income Tax Department च्या नावाने Income Tax India च्या अधिकृत मेल आय डी शी मिळत्या जुळत्या पद्धतीचा Domain वापरुन तसेच इनकम टॅक्सचा अधिकृत लोगो बेकायदेशीर पद्धतीने वापरुन ईमेल करून तो मेल अधिकृत असल्याची खात्री पटविली जाते.

- या ई-मेल मध्ये सदर व्यक्तीचे नाव नमूद करून त्यास इनकम टॅक्स रिफंड साठी सूचना दिल्या जातात. **रीमोट ॲक्सेस घेणाऱ्या ॲप्लिकेशनची लिंक देऊन ते डाऊनलोड करायला सांगितले जाते.** ह्या ॲप्लिकेशनचे नाव “ सर्टिफिकेट “ असे ठेवून ते धोकादायक नाही असे भासविले जाते.

- **पीडित व्यक्तीने हे ॲप्लिकेशन इंस्टॉल केले की त्याच्या मोबाइलचा ॲक्सेस सायबर गुन्हेगारास मिळतो** आणि याचा वापर करून गुन्हेगार संबंधित व्यक्तीची खाजगी, व्यावसायिक तसेच बँकिंग संबंधी माहिती, यूजरनेम, पासवर्ड तसेच ऑनलाइन बँकिंग साठी प्राप्त झालेल्या ओटीपी ची माहिती मिळवून पिडीताच्या बँक खात्यावरून पैसे इतर बँक अकाऊंट मध्ये ट्रान्सफर केले जातात.




- **पिडीताच्या बँक खात्यावरून चोरलेले पैसे, हे गुन्हेगार पुढे Crypto-Currency मध्ये ट्रान्सफर करून घेतात.** ज्यामुळे त्या पैशाचा शोध घेणे अशक्यप्राय होते.

# काय खबरदारी घ्याल ?

- इनकम टॅक्स डिपार्टमेंट कडून आलेले मेल खरच त्यांच्याकडून प्राप्त झाले आहेत का ? याची खात्री करा. त्याकरिता प्राप्त **ईमेलचे डोमेन @incometaxindiaefiling.gov.in** हे आहे का हे तपासा.

- **ईमेल द्वारे प्राप्त सूचना, त्यातील मजकूर नीट वाचून समजून घ्या.** शंका असल्यास तो ईमेल आपल्या ओळखीच्या सीए ला अथवा संबंधित विषयातील माहीतगार व्यक्तिला दाखवून समजावून घ्या.

- ईमेल मध्ये जर **www.incometaxindiaefiling.gov.in** या वेबसाइट व्यतिरिक्त इतर कोणतीही यूआरएल असेल तर ती उघडू नका.

- **अनोळखी ॲप्लिकेशन त्याचे नाव काहीही असले तरी डाऊनलोड करू नका.**

- एखादे ॲप्लिकेशन (यूआरएल द्वारे किंवा प्ले स्टोर मधून) आपल्या मोबाइल मध्ये डाऊनलोड करून **इंस्टॉल करताना त्याला आपण कोण-कोणती परवानगी देतो हे तपासा.** त्याबाबत नेहमी जागरूक रहा.

- आपल्या इनकम टॅक्स अकाऊंट ची माहिती आपणास **www.incometaxindiaefiling.gov.in** या वेबसाइट वर **आपल्या PAN खात्याद्वारे लॉगिन करून मिळू शकते** त्याकरिता आपणास आलेल्या ईमेल अथवा एसएमएस वर विश्वास ठेवू नका.

- **आपणास जर असा संशयास्पद मेल प्राप्त झाला असेल तर त्वरित सायबर सेल येथे संपर्क करा.**

# सावध व्हा, सुरक्षित रहा

अधिक माहिती करिता संपर्क -

## सायबर सेल

गुन्हे शाखा,

पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालय

Mail- cybercell.pcpc-mh@mahapolice.gov.in
Contact No.- 020- 27350939